स्थापना : १० जानेवारी २०१०

रजि.नं.महाराष्ट्र २९२/१०/सांगली

अंक : जानेवारी/फेब्रुवारी २०१८

ISBN978-93-83797-50-1

# चारुता सागर विशेषांक



॥ ज्ञानम् सर्वस्वी साध्यम् ॥

## चारुता सागर प्रतिष्ठान

ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली (महाराष्ट्र)

# चारुता सागर यांच्या कथा : वास्तव चित्रण

**प्रा. डॉ. सुरेश पाटील**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र,
मुक्त विद्यापीठ नाशिक, संपर्क : ९४२२२९२६७०

कसदार लेखनासाठी वाचन उपयुक्त असते. याचबरोबर जीवनातील विविध अनुभवही लेखनास मदत करीत असतात. या दोन्ही बाबी चारुता सागर यांच्या व्यक्तिमत्त्वासाठी पूरक ठरल्याने त्यांचे लेखन दमदार साहित्यकृती म्हणून उदयास आले. वय वर्षे चौदा ते सव्वीस चारुता सागर भटकत होते. अखंड भटकंती करीत संपूर्ण एक तप त्यांनी पाठीशी घातले. एका प्रवासात शरदबाबूंची 'बडीदीदी' ही कादंबरी त्यांनी वाचली. वाचनाची गोडी निर्माण झाल्याने संपूर्ण शरदबाबू झपाटल्यागत त्यांनी वाचला. वाचनाबरोबर संपूर्ण वंगभूमी पायाखाली घातली. त्यांचे आयुष्य खेड्यातच व्यतीत झाले; मात्र या साऱ्या विविधांगी अनुभवांनी आणि व्यासंगाने त्यांच्या मनाची मशागत झाली.

### चारुता सागर यांच्या साहित्यातील कथाबीजे

चारुता सागरांच्या कथेची बीजे गाव-गाड्याबरोबरच विस्तारित स्वरुपाची दिसतात. डोंबारी, नंदीवाले, गारुडी, फासेपारधी, जोगती, रामोशी, बेरड, मढे उचलणारे, वाटमारी करणारे, दरोडेखोर या भटक्या समूहाचे चित्रण त्यांच्या कथेत दिसते. उघड्या जगात निवास करणाऱ्या या समूहाची जीवनशैली, त्यांचा रोजचा संघर्ष चारुता सागर यांनी शब्दबद्ध केला आहे. समाजातील बेवारस, उपेक्षित आणि उघड्यावर जगणाऱ्यांचे आयुष्य चारुता सागरांनी चितारले आहे. गावातल्या घराघरांतून मागून आणि मिळेल ते आणलेले खाणाऱ्या, अंगावर चिंध्यांची लक्तरे ल्यालेल्या, आडरानात, माळावर, दगडांत, काट्यांत पालं टाकून राहणाऱ्या माणसाच्या कथा त्यांनी चित्रित केल्या आहेत. आयुष्यभर भटकत राहणाऱ्यांची जीवनपद्धती, परस्परसंबंध आणि भावभावनांचे चित्रण त्यांच्या कथेत दिसते. शेवंताचे लग्न ज्याच्याशी ठरले तो बाबल्या कसरत करताना तारेवरून कोसळून जखमी होतो. साऱ्यांचा विरोध असतानाही शेवंता बाबल्याशीच लग्न करण्याचा निर्णय घेते. हे चित्रण 'ढोलगं' या कथेत येते. समाजाच्या विरोधास न जुमानता पळून जाऊन लग्न करणाऱ्या धुरपा व आप्पाण्णाची कहाणी 'निवाडा' या कथेत सागरांनी मांडली आहे. नंदीवाले समाज आणि त्यांची जातपंचायत यांच्यामधील सूक्ष्मतम निरीक्षण आणि वर्णन या कथेत दिसते. 'पुंगी' या कथेत सागरांनी सापगारुडी कुटुंबाची कैफियत मांडली आहे. खाला आणि अलीखाँ यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सापावर चालणारा असतो. सापाला ते घरातील सदस्य मानतात. त्याच्यावर ते जीवापाड प्रेम करतात; परंतु या कथेचा शेवट संघर्षपूर्ण आणि शोकात्मक दाखवला आहे. जोगतिणीचे भावविश्व 'दर्शन' कथेत आढळते. तथाकथित धर्माच्या नावाखाली केले जाणारे महिलांचे शोषण येथे लेखकाने मांडले आहे. भटक्यांच्या जीवनाचे चित्रण 'वाट' कथेत आले आहे. दिशाहीन जीवन असलेल्या; तसेच गाव आणि शिवेचाही निश्चित ठावठिकाणा नसलेल्या पारधी समाजाचे चित्रण येथे आले आहे.

भटक्यांच्या जीवनशैलीचे इतके सूक्ष्म आणि हृदयस्पर्शी चित्रण वाचताना लेखकाच्या व्यापक आणि विलक्षण अनुभवविश्वाची प्रचीती येते. 'वाट' या कथेत जखऱ्याची म्हातारी शेवटच्या घटका मोजत असते. एका

तपापूर्वी भेटलेल्या मुलीच्या भेटीसाठी ती अखेरच्या क्षणी आसुसलेली असते. जखऱ्याचा सांगावा बहीण कावेरीला तुळजापूरच्या बाजारात मिळतो. तेथून ती असते तशी अनवाणी आईला भेटायला निघते. तिच्या असहाय्य अवस्थेतील पायी प्रवासाचे प्रत्ययकारी चित्र या कथेत वाचावयास मिळते. ती चालत असताना कितीतरी वाहने तिच्याजवळून जातात. अनवाणी आणि अखंड चालून तिचे पाय सुजतात आणि तळपाय सोलतात, तरी ती जीवाच्या आकांताने आणि आईच्या भेटीच्या आतुरतेने चालत राहते. अखंडपणे चालत पाचव्या दिवशी दंडोबाच्या डोंगरावर येऊन ती तपास करते, तेव्हा आई आधीच गेल्याचे तिला कळते. तेव्हा हंबरडा फोडत ती परतते. यावेळची चारुता सागरांची लेखनशैली मनाचा ठाव घेते. संवेदनशील माणसाला आतल्या आत विषण्ण करते.

### उपेक्षित आणि शोषित स्त्रीजीवन

चारुता सागरांच्या साहित्यात स्त्रीजीवनाचे विपुल आणि विस्तृत चित्रण वाचावयास मिळते. ग्रामीण स्त्रीची होणारी कुचंबणा त्यांनी आपल्या कथेतून प्रभावीपणे मांडली आहे. 'धुणं' ही एक प्रतीकात्मक कथा आहे. जुन्या काळातील ग्रामीण स्त्रियांचे मन मोकळे करण्याची विहीर, तलाव, नदी अशी पाणवठ्याची ठिकाणे असायची. स्त्रियांची दुःखे प्रकट करण्याच्या या हक्काच्या जागा असत. दोन-तीनशे घरे असलेल्या खेडेगावात सर्वच जाती-जमातीची घरे असायची. या घराघरांत घडणाऱ्या घटना-प्रसंगांचे प्रतिबिंब पाणवठ्यावर उमटणे साहजिकच असे. अशा घराघरांत घडणाऱ्या घटना-प्रसंगांतील भावभावनांना वाचा फोडणारी ही कथा आहे. 'बाबा, मला माफ करा!' या कथेत डोहात विसावणारी उमा वाचकाला अस्वस्थ करून जाते. जोगतीण म्हणून पांढऱ्या, तांबड्या मण्यांची माळ घालणाऱ्या तुळसा, पुतळा आणि रुकीची कथा स्त्रीला मिळालेलं जनावरांपेक्षाही हिणकस जगणं वाचकांसमोर आणते. रूढी, परंपरा आणि धर्म यांच्या नावाखाली स्त्रियांचे शोषण करणाऱ्या मानसिकतेतील जगाची ही कथा आहे. जोगतिणीचे भावविश्व 'दर्शन' कथेत आढळते. तथाकथित धर्माच्या नावाखाली केले जाणारे महिलांचे शोषण येथे लेखकाने मांडले आहे. जुन्या बुरसट विचारांना चालना देत स्त्रीवर्गाला तिच्या शोषणाची जाणीव होऊ न देता सातत्याने शोषण करणाऱ्या समाजाची ही कहाणी आहे.

### अस्सल ग्रामजीवनाचे चित्रण

चारुता सागराच्या कथेत खऱ्या अर्थाने ग्रामजीवनाचे चित्रण येते. साप, नाग, अजगर, बैल, म्हैस, गाढव अशा पात्रांचा वावर त्यांच्या लेखनात वारंवार येतो. हंबिऱ्या आणि पाखऱ्या बैलांचं जीवाभावाचं नातं बळीशी असतं. आपल्या आवडत्या बैलांची उपासमार त्याला आतल्या आत कुरतडत असते. 'म्हस' ही माणूस आणि प्राणिजीवन यातील भावबंधाची कथा आहे. म्हस जेव्हा मरण पावते, तेव्हा कुटुंबातील सदस्य गेल्याची भावना सगळ्यांची होते. शिल्या आणि कबिऱ्या कथेतही प्राणी आणि कुटुंबातील माणसांच्या भावविश्वातील जिव्हाळ्याची कहाणी अनुभवायला मिळते. शिल्या मरतो तेव्हा त्याला विधिवत मळ्यातच पुरलं जातं. लवकरच कबिऱ्याही खचून मरण पावतो. त्याच्या मृत्यूनंतरचे वास्तव चित्रण लेखकाच्या जिवंत शैलीतून वाचावयास मिळते.

'नागीण' ही कथा एकूण मराठी कथाविश्वात वैशिष्ट्यपूर्ण ठरणारी अशी आहे. मानवाबरोबरच प्राणिविश्वातील प्रेमी जोडप्यांच्या भावविश्वातील प्रणयप्रवास या कथेत लेखकाने आत्यंतिक प्रत्ययकारी प्रतिभेने साकारला आहे. बापू -चंद्रा आणि नाग - नागीण या दोन जोडप्यांचा प्रणय प्रवास आणि आपल्या जोडीदाराचा बदला घेण्याची माणसाबरोबरच प्राण्यांमध्येही असणारी सहजभावना या कथेचा मूळ धागा आहे. माणसांप्रमाणेच प्राण्यांनाही भावभावना असतात. त्यांनाही स्मरण असते. तेही डूख धरून बदला घेऊ शकतात, याची प्रचीती या कथेत येते. 'गर्भगंध' कथेतही नाग-नागिणीचे अद्भुत विश्व अनुभवायास मिळते. मनोमीलन हा नवनिर्मितीचा आणि साफल्याचा क्षण असल्याचे चित्रण सागरांनी केलेले आहे.

चारुता सागरांनी लष्करात काम केले होते. त्यामुळे सैनिकी जीवनातील आणि विश्वातील अनुभवांचे चित्रण त्यांच्या लेखनात येताना दिसते. आपले स्वतःचे गाव, कुटुंब, नातेवाईक यांपासून दूरवर वास्तव्य असलेल्या व्यक्तीचे भावविश्व येथे वाचकास अनुभवावयास मिळते. आत्यंतिक शिस्त, यंत्रासारखे जगणे आणि सतत वरिष्ठांच्या आज्ञेत असणाऱ्या व्यक्तीचे विश्व सागरांनी मांडले आहे.

देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या आणि पहारा करणाऱ्या माणसाचे अनुभव येथे पाहावयास मिळतात. पूल, हॉलिडे होम, निरोप, अंघोळ या कथांमध्ये लष्करी जीवनातील अनुभव मांडण्यात आले आहेत. लष्करी जीवन हे स्त्रीसंगाचा अभाव असणारे विश्व आहे. यामुळे लष्करात काम करणाऱ्या पुरुषांमधल्या स्त्रीविषयक आकर्षणाचे, आसक्तीचे आणि शरीरमोहाचे अनुभव या कथांमध्ये आले आहेत. विशेष म्हणजे या कथांमध्ये रंजकता टाळत गंभीर आणि वास्तव अनुभवचित्र समाजापुढे आणण्याचा, मांडण्याचा चारुता सागर यांचा उद्देश दिसून येतो.

चारुता सागरांच्या कथाविश्वात मरणानुभवाची चित्रणे दिसतात. अशी चित्रणे विविध तऱ्हेची आहेत. त्यात मानवी सृष्टीतील अनुभव आहेत, तसे प्राणिसृष्टीतीलही मरणानुभव आहेत. त्यांच्या कथेत दुष्काळामध्ये असहाय्य पाळीव जनावरे मृत्युमुखी पडतात. सासरचा जाच सहन न झाल्यामुळे सासुरवासिणी गावातल्या विहिरीत किंवा डोहात मरणाला जवळ करतात. सर्पदंशामुळे मनुष्याचे संपलेले जीवनही सागरांच्या कथेत सापडते. निराधार लोकांचे; तसेच वार्धक्याने येणाऱ्या मरणानुभवांचेही चित्रण त्यांच्या कथेत मिळते. 'किंकाळी' या कथेत लेकुरवाळी बाई छळापासून सुटका करून घेण्यासाठी आपल्या मुलासह विहिरीत जीवन संपविण्याचा प्रयत्न करते. 'वर्दी' कथेतही चारुता सागरांनी मरणाचा थरार उभा केला आहे. बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावणाऱ्या तरुणांची ही कथा आहे. गुणवंतराव टेलरच्या दुकानाच्या फळीवर मरून पडलेल्या बेवारस मृतदेहाची विल्हेवाट सत्याप्पा व बऱ्या लावतात. असे काम करणारी ही माणसे पुलाखाली मरणासन्न अवस्थेत असलेल्या म्हातारीच्या मृत्यूची वाट पाहतात. तिच्या मृत्यूची वाट पाहता-पाहता त्यांचीच उपासमार व्हायला लागते. त्या उपासमारीत बऱ्याचा मृत्यू होतो, तेव्हा आपल्या मित्राच्याच मृत्यूची वर्दी दुसऱ्याला द्यावी लागते. माणसाचं जगणं आणि त्यातील कठीण आणि करुण प्रसंगांचे हुबेहूब चित्रण हा चारुता सागरांच्या लेखणीचा विशेष पैलू येथे उठून दिसतो.

### सागरांचे वेगळेपण आणि वैशिष्ट्ये

चारुता सागरांचे लेखन ज्या काळात झाले, त्या काळातील लेखनाचे विषय परंपरागत पद्धतीचे होते. परंतु सागरांनी चाकोरीबाहेरील विषय घेत आपले साहित्य वाचकांसमोर आणले. परंपरागत लेखकांना अनपेक्षित असलेल्या जीवनानुभवांची क्षेत्रे त्यांनी आपल्या कथांमध्ये रेखाटली. रुळलेल्या आणि मळलेल्या वाटा आणि विषयांपेक्षा अलक्षित आणि अनपेक्षित विषयांना त्यांनी हात घातला. त्यांनी त्यांच्या कथांमध्ये मांडलेले विषय आणि अनुभव इतके वेगळे होते, की पारंपरिक लेखकांत आणि समीक्षकांतही प्रारंभी विस्मय दिसून आला. अशा अनुभवविश्वाची कल्पना समकालीन अभ्यासक आणि वाचकांनाही नव्हती. विलक्षण अनुभवविश्व, त्यातील वैविध्य यासोबतच त्यांच्या वाङ्मयाची गुणवत्ता उच्चतम राहिली आहे. त्यांची शैली अनुभवांना अनुरूप आहे. भाषेत परिपक्वता आणि शहाणपण आहे.

सागरांच्या कथेतील अनेक अनुभव त्यांच्या विशिष्ट भाषा वापरातून सामोरे येतात. त्यांच्या भाषेचा वापर अनुभवताना अनेकदा वाचक थबकतो, विस्मयचकित होतो. त्यांच्या शैलीमुळे हुरहूर, जिज्ञासा, अस्वस्थता वाढत जाते. पुढे काय होणार, याची उत्सुकता वाढत जाऊन वाचक खिळून राहतो. त्यांच्या लेखनात निवेदनाच्या विविध खुबी आढळतात. कथांच्या आशय- विषयाला अनुरूप आणि प्रकृतीस सुसंगत अशी प्रथमपुरुषी, द्वितीयपुरुषी अथवा तृतीयपुरुषी निवेदनशैली त्यांनी वापरलेली दिसून येते. त्यांच्या कथेतील अनुभवविश्व, कथानक, भाषा आणि शैली यांमुळे एकूणच मराठी साहित्य समृद्ध करणारे चारुता सागर यांचे योगदान वादातीत आहे.

चारुता सागरांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांतून जीवनाचा खरा अर्थ कळत जातो. मानवी जीवनाचे विविध रंग, मनाच्या विविध अवस्था मांडण्याची विलक्षण शैली वाचकाला अंतर्मुख करतेच, तसेच ती खिळवूनही ठेवते. त्यांच्या कथांमध्ये प्रसंगांच्या ओघाने येणारी नाट्यमयता जागोजागी पाहायला मिळते. ग्रामजीवनातील परंपरा, लोकसमजुती, लोकारुढी, तेथील लोकांचे समूहजीवन, दुष्काळाचे चटके, मुक्या जनावरांचे प्रेम या सर्व बाबी वाचकाला खिळवून ठेवतात. परंपरागत कृषिजीवनातील अनुभव, व्यक्ती-व्यक्तींमधील भावसंबंधातील हळवेपण, घटना-प्रसंगांची रेलचेल, त्यात वेळोवेळी डोकावणारी नाट्यमयता ही चारुता सागरांच्या

कथासाहित्याची वैशिष्ट्ये आहेत.

**अंतर्गत उत्स्फूर्त ऊर्मी आणि अपरंपरागत जीवनप्रवास**

मूळच्या दिनकर दत्तात्रय भोसले यांचे एकूणच आयुष्य अतिशय खडतर होते. त्यांच्या आयुष्याकडे आणि साहित्यप्रवासाकडे पाहिल्यानंतर लेखन आणि उच्च दर्जाची साहित्यनिर्मिती होण्यासाठी लेखकाला परिस्थिती अनुकूल लाभण्यापेक्षा त्याच्या ठायी असलेली लेखनाची तीव्र ऊर्मी आणि जाज्वल्य अनुभवांची जोड महत्त्वपूर्ण ठरते. आईच्या निधनानंतर ते घराबाहेर पडले होते. सतत बारा वर्षे ते रस्ता मिळेल तिकडे भटकंती करीत राहिले. मिळेल ते काम करीत राहिले. सैन्यातील नोकरीही त्यांच्या भटकंतीला पूरक अशीच ठरली. तीही त्यांच्या आयुष्यासारखी खडतर अशीच होती. अगदी हलाखीच्या काळात, खडतर आयुष्यातही ते वाचन करीत होते. ही बाब त्यांच्यातील खरा साहित्यिक जागृत असल्याची आणि तो सातत्याने विकसित होत असल्याची साक्ष देणारी आहे. त्यांचा वाचनाचा सपाटा शिक्षक झाल्यानंतर आणखी वाढतच गेला. जीवनातील विविधांगी अनुभवांसह उत्तम वाचक आणि चिंतनशील मनाची माणसे भविष्यात मोठे साहित्यिक झाल्याचे वारंवार निदर्शनास येते. अशा गोतावळ्यात त्यांचा धागा जुळतो तो अण्णा भाऊ साठे यांच्याशी ! १९६० नंतर मराठी साहित्यात दलित आणि ग्रामीण दोन प्रवाह मोठ्या जोमाने आले. याच काळात चारुता सागरांचे लेखन पुढे आले. ग्रामीण साहित्याला प्रादेशिक आणि दलित साहित्याला सामाजिक अनुभवांच्या चौकटीत अडकावून मर्यादित केले जात असताना जात- प्रांतनिरपेक्ष ठरले. त्यांच्या साहित्यातील अनुभवविश्व दुर्लक्षित, अनपेक्षित आणि विलक्षण असूनही जात-प्रांतांची जोखडे अलगद बाजूला करीत अस्सल साहित्य म्हणून पुढे आले. त्यांच्या साहित्यात दारिद्र्य आणि रूढी -परंपराचे दाहक अनुभव आहेत; मात्र आक्रोश नाही. वास्तवाचे चित्रण आहे. असह्य आणि दाहक जीवनानुभवांची जशीच्या तशी मांडणी करताना सागरांमधला लेखकही तटस्थ जाणवतो. यामुळेच चारुता सागरांच्या लेखनाचा दर्जा वरचा आणि वेगळा म्हणून उठून दिसतो.

●●●




ज्येष्ठ लेखक आप्पासाहेब पाटील यांच्या 'आक्रीत' या कादंबरीचे प्रकाशन करताना लेखक रंगराव पाटील, यशवंत माळी, बाळासाहेब कोठावळे, सगरे गुरुजी व प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे सोबत मान्यवर.